तरुण भारत

# मानवजातीच्या प्रगतीसाठी अक्षय ऊर्जा आवश्यक

## कुलगुरू डॉ. राजनीस कामत यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

कोल्हापूर

अक्षय ऊर्जेचा वापर वाढवून पर्यावरणपूरकता जपण्याकडे जागतिक समुदायाचा कल वाढवण्याची गरज आहे. पदार्थ व ऊर्जा अखिल मानवजातीच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक आहेत, असे प्रतिपादन डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील ग्यान कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांचे स्वागत करताना डॉ. कैलास सोनावणे. सोबत डॉ. सागर डेळेकर, डॉ. महादेव देशमुख, डॉ. पी.पी. वडगावकर, डॉ. जी.बी. कोळेकर आणि डॉ. केशव राजपुरे.

शिवाजी विद्यापीठात रसायनशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित ग्यान कार्यशाळेचा समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. वरिष्ठ संशोधक डॉ. पी. पी. वडगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, खनिज उर्जासाधनांच्या अतिरेकी वापराचे दुष्परिणाम पर्यावरणावर मोठ्या प्रमाणावर होत आहेत. त्यामुळे अपारंपरिक ऊर्जेचा वापर वाढविणे आवश्यक आहे.

डॉ. पी. पी. वडगावकर म्हणाले, या कार्यशाळेतून संशोधक विद्यार्थ्यांना वेगळी दिशा मिळेल. त्यातून साकारणारे संशोधन समाजोपयोगी असेल. समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी आढावा घेतला. अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी परिचय करून दिला. डॉ. जी. बी. कोळेकर यांनी आभार मानले. अमेरिकेतील नॉत्रे दॅम विद्यापीठातील शास्त्रज्ञ प्रा. पी. व्ही. कामत यांनी कार्यशाळेत शाश्वत ऊर्जा क्षेत्रातील अत्याधुनिक संशोधन व तंत्रज्ञानाविषयी माहिती दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 OCT 2023
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात स्टुडंट कट्टा सुरू

## मास कम्युनिकेशन विभागाचा उपक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागात स्टुडंट कट्टा हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

स्टुडंट कट्टा या उपक्रमात महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञ व्यक्तींच्या मास कम्युनिकेशन तसेच पी.जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम या अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मुलाखती घेणार आहेत. तज्ज्ञ अभ्यासक, संशोधक, तसेच विचारवंतांना पाचारण करण्यात येणार असल्याचे मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी सांगितले. कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, स्टुडंट कट्ट्यावर अनेक तज्ज्ञ लोक येऊन मुलाखती देणार असल्याने विद्यार्थ्यांसाठी ज्ञान आणि माहिती मिळवण्याची ही चांगली संधी आहे. या सर्व मुलाखती मास कम्युनिकेशनच्या 'स्पार्क' या यूट्यब चॅनलवरून प्रसारित केल्या जाणार आहेत.




स्टुडंट कट्टा उपक्रमाचा कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते प्रारंभ झाला. यावेळी उपस्थित डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. शिवाजी जाधव आदी.

स्टुडंट कट्ट्यावर विद्यार्थ्यांनी डॉ. शिंदे यांची 'राज्यातील संभाव्य दुष्काळ आणि पाणी नियोजन' या विषयावर प्रकट मुलाखत घेतली. पी. जी. डिप्लोमाचा विद्यार्थी अक्षय जहागीरदार याने मुलाखतीचे संचालन केले. स्वागत व प्रास्ताविक मास कम्युनिकेशन तथा पत्रकारिता अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. यावेळी जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. प्रसाद ठाकूर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 OCT 2023

सकाळ

# 'विद्यार्थी कट्ट्यावर' तज्ज्ञ करणार मार्गदर्शन

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन (जनसंवाद) विभागात स्टुडंट कट्टा (विद्यार्थी कट्टा) अभिनव उपक्रमाचे उद्‌घाटन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्याहस्ते झाले.

या उपक्रमात महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञ व्यक्तींच्या मास कम्युनिकेशन तसेच पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम अभ्यासक्रमाचे विद्यार्थी हे मुलाखती घेणार आहेत.

दरम्यान, स्टुडंट कट्ट्यावर विद्यार्थ्यांनी डॉ. शिंदे यांची 'राज्यातील संभाव्य दुष्काळ आणि पाणी नियोजन' यावर मुलाखत घेतली. विद्यार्थी अक्षय जहागीरदार याने मुलाखतीचे संचालन केले. मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. यावेळी जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे, प्रसाद ठाकूर उपस्थित होते.




**कोल्हापूर : स्टुडंट कट्टा उपक्रमाचे उद्‌घाटन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे, शिवाजी जाधव, प्रसाद ठाकूर उपस्थित होते.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 OCT 2023
तरुण भारत

# विद्यापीठात स्टुडंट कट्ट्याचे उद्घाटन

## कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची माहिती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागात स्टुडंट कट्टा हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. याचे उद्घाटन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या कट्ट्यावर विद्यार्थ्यांनी डॉ. शिंदे यांची राज्यातील संभाव्य दुष्काळ आणि पाणी नियोजन यावर मुलाखत घेतली. अक्षय जहागीरदार याने संचालन केले. प्रास्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. यावेळी जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. प्रसाद ठाकूर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर

28 OCT 2023

तरूण भारत

# उद्योजकता वाढीसंदर्भात कार्यशाळेत मार्गदर्शन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील संशोधन आणि विकास फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. डी. राऊत, लाइफलॉंग लर्निंगचे संचालक डॉ. आर. जी. पवार, कौशल्य विकास अधिकारी प्रमोद कांबळे यांनी उद्योजकतेसंदर्भात मार्गदर्शन केले. यामध्ये आर्थिक वाढ आणि सामाजिक नवकल्पना चालविण्यामध्ये उद्योजकतेच्या महत्त्वावर वक्त्यांनी त्यांचे अंतर्दृष्टी सामायिक केले. त्यांनी व्यवसाय सुरू करण्याच्या एकूण प्रक्रियेवर चर्चा केली.

शिवाजी विद्यापीठातील उद्योजकता विकासाबद्दल विचारमंथन, इंस्टीट्युशनस् इनोव्हेशन कौन्सिल,

## १५० हून अधिक विद्यार्थी, प्राध्यापकांची उपस्थिती

डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान अभियांत्रिकी महाविद्यालय साळोखेनगर येथे उद्योजकता विकास, नवोपक्रम, स्टार्टअप कार्यक्रमाचे आयोजन केले होते. डॉ. शिवानी काळे, पृथ्वीराज चव्हाण, आकाश साखरे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम पार पडला. कॅम्पस डायरेक्टर डॉ. अभिजित माने आणि डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग साळोखेनगर कोल्हापूरचे प्राचार्य डॉ. सुरेश माने यांनी इच्छुक उद्योजकांना पाठिंबा दिला. या कार्यक्रमात १५० हून अधिक विद्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अस्मिता संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहाचे उद्‍घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. केदार मारुलकर, पंडित मारुलकर, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रमेश पोवार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

# 'अस्मिता संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहा'चे उद्‍घाटन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे माजी सहाय्यक कुलसचिव पंडित मारुलकर आणि पत्नी रजनी मारुलकर यांनी त्यांची कन्या अस्मिता हिच्या स्मरणार्थ विद्यापीठास दिलेल्या ३५ लाखांच्या निधीतून विद्यापीठात उभारलेल्या अस्मिता संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहाचे उद्‍घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाचे अस्मिता संशोधक विद्यार्थिनी वसतिगृह हे आईवडिलांचे दिवंगत मुलीप्रती प्रेम, ज्ञानाप्रती आस्थेचे चिरंतन प्रतीक म्हणून ओळखले जाईल. मारुलकर दांपत्याने विद्यापीठाला दिलेला ३५ लाखांतून वसतिगृह साकारले आहे. यातून त्यांनी विद्यापीठाशी चिरंतन नाते जोडले आहे. लोकवर्गणीतून विद्यार्थिनींसाठी 'लोकस्मृती वसतिगृह' निर्माण करण्याची संकल्पना साकार झाली आहे. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, रजनी मारुलकर, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. जगदीश सपकाळे, डॉ. केदार मारुलकर, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, रमेश पोवार, रणजीत यादव, डॉ. प्रतिमा पवार, डॉ. माधुरी वाळवेकर, अमित कांबळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 OCT 2023

पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेत ६६ गैरप्रकारांची नोंद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षांतर्गत शुक्रवारी ६६ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे. यात सांगली-६, कोल्हापूर-२८, सातारा-३२ गैरप्रकारांचा समावेश आहे.

शुक्रवारी (दि. २७) बीए, बीकॉम, बीबीए, बीएस्सी, बॅचलर ऑफ लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स, बॅचलर ऑफ कॉमर्स बँक मॅनेजमेंट, मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ रूरल स्टडीज, मास्टर ऑफ जर्नालिझम आदी २९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागामध्ये झाल्या. परीक्षेला ४४ हजार ५३० विद्यार्थी उपस्थित होते, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 OCT 2023
सकाळ




# बास्केटबॉल स्पर्धेमध्ये न्यू कॉलेजला विजेतपद

कोल्हापूर, ता. २७ : वारणानगर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय बास्केटबॉल स्पर्धेत न्यू कॉलेजच्या मुलांच्या संघाने विजेतपद पटकावले. पेठवडगावच्या विजयसिंह यादव महाविद्यालयाविरुद्धच्या अंतिम सामन्यात न्यू कॉलेजने ५७ विरुद्ध २६ गुणांची कमाई केली.

आदित्य दाहोत्री, जितेंद्र साहू, कुणाल पाटील, प्रणव चव्हाण, ओंकार चोपडे, प्रतीक काशीद, विनायक जरग यांचा संघात समावेश होता. त्यांना चेअरमन के. जी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांचे प्रोत्साहन, तर क्रीडा विभागप्रमुख प्रा. अमर सासने, दीपक पाटील व दत्तात्रय भोपळे यांचे मार्गदर्शन मिळाले.

## आंतरविभागीय तायक्वाँदो स्पर्धा : तीन जिल्ह्यांतून शंभर खेळाडूंचा सहभाग

# देवचंदला सर्वसाधारण विजेतेपद

▸ सकाळ वृत्तसेवा

नानीबाई चिखली, ता. २७ : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय तायक्वाँदो स्पर्धा अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद कॉलेजमध्ये मोठ्या उत्साहात झाल्या. स्पर्धेमध्ये पुरूष व महिला विभागात देवचंद कॉलेजने सर्वाधिक गुण मिळवून सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. स्पर्धेसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून सुमारे शंभर खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पंचप्रमुख पद्माकर कांबळे यांच्या नेतृत्वाखाली सुरज कुंभार, शितल शिंत्रे, अमीर मुलानी, राजू जाधव, उदय माळी, अक्षय खेतमर, अक्षय पवार आदींनी



**अर्जुननगर (ता. कागल) : येथील देवचंद महाविद्यालयात झालेल्या आंतरविभागीय तायक्वाँदो स्पर्धतील विजेत्या संघासोबत प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे. या वेळी मान्यवर उपस्थित होते.**

परिश्रम घेतले.

पात्रता कमिटीमध्ये प्रा. डॉ. श्रीनिवास पाटील, प्रा. राहुल लहाने, प्रा. डॉ.धनंजय पाटील यांनी काम प्राहिले.

शिवाजी विद्यापीठाचे निवड समितीचे अध्यक्ष डॉ. विनायक भागवत, सदस्य प्रा. गौरव चव्हाण प्रा. शिल्पा शिरोटे, स्पर्धा निरीक्षक प्रा. अनिता व्हटकर, देवचंदच्या प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे आदींचे स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य लाभले. तर जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिष शहा, उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शहा, सुबोध शहा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. डॉ. एस. एस. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एन. डी. कुंभार यांनी आभार मानले.

पुरूष स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे - ५४ किलो गट - ओमकार मार्तंड (डी. डी. महाविद्यालय वाकरे), ओम शेवाळे (कराड), अलताज जमादार (इस्लामपूर). ५८ किलो गट - आदित्य लाखे (इस्लामपूर), अलोक मादवी (जयसिंगपूर), रोहित बेनकर (वारणानगर).

६३ किलो गट - शहेनशाह मुजावर (देवचंद कॉलेज), ऋषिकेश कोंडाळे (महावीर कॉलेज कोल्हापूर), रोहित मालवणकर (विटा). ६८ किलो गट - कबिरसिंग ठाकुर (सांगली), ज्ञानेश्वर वाकुडे (देऊर, सातारा), प्रथमेश मगदूम (डी. आर. माने, कागल).

७४ किलो गट - हर्षवर्धन सागर (आटपाडी), आदित्य मोहिते (वारणानगर), आदर्श मगदूम (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर). ८० किलो गट - प्रसाद पाटील (विटा), शिरीष पाडूळकर (सांगली), विशाल वराळे (विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर). ८७ किलो गट - अवधूत पोवार (इस्लामपूर), अथर्व कोंडस्कर (राजाराम कॉलेज, कोल्हापूर), ओमकार देसाई (आष्टा) ८७ हून अधिक वजनी गट अंकित खुरपे (देवचंद कॉलेज)